**सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**
**व्यवस्थापन परिषदेच्या एकतिसाव्या सभेचा कार्यवृत्तांत**
**सोमवार, दि.२८ फेब्रुवारी, २०११ दुपारी १:०० वा.**

**व्यवस्थापन परिषदेची एकतिसावी सभा सोमवार, दि.२८/०२/२०११ रोजी दुपारी १:०० वा.** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बंडगर बी. पी. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. सुर्यवंशी ए. बी. | सदस्य |
| ३) | प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन. संचालक म. व वि .वि. मंडळ | सदस्य |
| ५) | प्राचार्य पवार एस. के. | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ. गणगे के. एन. | सदस्य |
| ७) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ८) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ९) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्य |
| १०) | श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ११) | डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| १२) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. | सदस्य |
| १३) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १४) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १५) | डॉ. साळुंखे डी. जे. परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १६) | डॉ. पुजारी डी. डी. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १७) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी. कुलसचिव | सचिव |

**अनुपस्थिती :**

प्रा. डॉ. पाटील टी. आर. यांनी पत्राद्वारे व डॉ. कदम बी. बी. यांनी दूरध्वनीद्वारे या सभेस अनुपस्थित रहाणार असल्याचे कळविल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

**स्वागतः**

मा.कुलसचिव यांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ ०१ ]** **दि.०६ जानेवारी, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव :** **दि.०६ जानेवारी, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह वाचून कायम करण्यात आला व कार्यालयीन कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.**
**१) ठराव क्र. १२ मध्ये, प्राचार्या डॉ. श्रीमती वडवान एम. ए. यांच्याऐवजी प्राचार्य डॉ. गणगे के. एन. अशी दुरुस्ती करावी. सदर दुरुस्ती प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. यांनी सुचविले व त्यास प्राचार्य पवार एस. के. यांनी अनुमोदन दिले.**

**[ ०२ ]** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

**ठराव :** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ]** **विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी सोलापूर शहर व परिसरातून जाण्या येण्यासाठी सिटी बसेसची आवश्यक त्या वेळेत व्यवस्था करण्याबाबत सोलापूर महानगरपालिका परिवहन विभागास विनंती करण्याबाबत अधिसभेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी:अधिसभा सदस्या डॉ. श्रीमती रजनी जयंत दळवी यांनी दि.२४/१२/२०१० रोजीच्या अधिसभेमध्ये ठराव क्र.१२ खालीलप्रमाणे मांडला.

"विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी सोलापूर शहर व परिसरातून जाण्या येण्यासाठी सिटी बसेसची आवश्यक त्या वेळेत व्यवस्था करावी अशी विनंती सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागास करावी, अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

"सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला"

याबाबत विद्यापीठाने पत्र क्र.SOL/UTY/३८७३, दि.२१/०८/२०१० नुसार व पत्र क्र.कुका/२०१०-११/८७५९, दि.१२/०१/२०११ अन्वये कार्यवाही केलेली आहे. त्यानुसार सकाळी १०:१५, १०:४५ वा. व सायंकाळी ५:१५, ६:०० वा. विद्यापीठ आवारात महानगरपालिकेच्या परिवहन व्यवस्थेच्या बसेस येतात.

सबब, अधिसभेची वरील शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव :** **अधिसभेने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून नोंद घेण्यात आली.**

**[ ०४ ]** **शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया प्रत्येक वर्षाच्या १ जूनपर्यंत पूर्ण करावी अशी विनंती विद्यापीठाने महाराष्ट्र शासनास करावी याबाबत अधिसभेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: अधिसभा सदस्य डॉ. एस. डी. भिलेगावकर यांनी दि.२४/१२/२०१० रोजीच्या अधिसभेमध्ये ठराव क्र. १३ खालीलप्रमाणे मांडला.

शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया प्रत्येक वर्षाच्या १ जूनपर्यंत पूर्ण करावी अशी विनंती विद्यापीठाने महाराष्ट्र शासनास करावी अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

वरील ठराव एकमताने मान्य करण्यात आला.

अधिसभेची वरील शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव :** **अधिसभेने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ ०५ ]** **प्रत्येक महाविद्यालयात प्राध्यापकांची (प्रोफेसर) १० टक्के पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सरकारने काढलेल्या आदेशाप्रमाणे (जी.आर.) परिनियमात दुरुस्ती करुन त्याप्रमाणे पदे भरावीत असा आदेश सर्व महाविद्यालयांना करावा अशी अधिसभेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणीः अधिसभा सदस्य श्री. अनिल वसंतराव देशपांडे यांनी दि.२४/१२/२०१० रोजीच्या अधिसभेमध्ये ठराव क्र.१४ खालीलप्रमाणे मांडला.

"प्रत्येक महाविद्यालयात प्राध्यापकांची (प्रोफेसर) १० टक्के पदं भरण्यासाठी महाराष्ट्र सरकारने काढलेल्या सरकारी आदेशाप्रमाणे (जी.आर.) परिनियमात दुरुस्ती करुन त्याप्रमाणे पदं भरावीत असा आदेश सर्व महाविद्यलयांना करावा अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

"सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला"

याबाबत विद्यापरिषदेच्या दि.२०/१२/२०१० रोजीच्या बैठकीत ठराव क्र.३६ नुसार समिती गठीत केली असून सदर समितीस विद्यापीठाने पत्र क्र. सोविसो/मविविमं/शिमा/२०१०-२०११/९१९४ दि.२५/०१/२०११ नुसार पत्र पाठविलेले आहे.

अधिसभेची वरील शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव :** **अधिसभेने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून नोंद घेण्यात आली.**

**[ ०६ ]** **विद्यापीठात School of Life Sciences ची स्थापना करण्याची अधिसभेची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी :- अधिसभा सदस्य डॉ.सयाजीराव पां.गायकवाड यांनी दि.२४/१२/२०१० रोजी झालेल्या अधिसभेमध्ये ठराव क्रं १८ अन्वये खालील प्रमाणे मांडला.

"School of Life Sciences" ची स्थापना करण्याची शिफारस अधिसभेने व्यवस्थापन परिषदेस व इतर संबंधितांना करावी.

त्यावर खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला .

"सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला".

अधिसभेची उपरोक्त शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव :** **अधिसभेने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ ०७ ]** **पदार्थविज्ञान संकुलाकडील १८ नग CRO निर्लेखन करण्याबाबत नियुक्त समितीचा अहवाल विचारार्थ.**

(टिपणी: पदार्थविज्ञान संकुलाकडील सध्या असलेले १८ नग CRO नादुरुस्त झालेले आहेत, ते दुरुस्त होण्याकरीता आवश्यक स्पेअर पार्टस् बाजारात उपलब्ध नसल्याने सदरचे CRO निर्लेखन करण्याबाबत डॉ. लोणीकर एस. व्ही. व डॉ. भोसले आर. बी. अशी द्विसदस्यीय समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीने तिच्या अहवालात १८ नग CRO निर्लेखित करावेत अशी शिफारस केलेली आहे.

सबब निर्लेखन समितीचा अहवाल विचारार्थ).

**ठराव :** **पदार्थविज्ञान संकुलाकडील १८ नग CRO निर्लेखन करण्याबाबत नियुक्त समितीचा अहवाल स्विकारुन निर्लेखन करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०८ ]** **सौराष्ट्र विद्यापीठाबरोबर रसायनशास्त्र संकूलाचा रासायनिक संशोधनासंबंधीचा सामंजस्य कराराचा मसूदा मान्यतेस्तव.**

(टिपणी: संचालक रसायनशास्त्र संकूल यांचे जा.क्र. SOL/UTY/CHEM/३३३ दि.०४/०१/२०११ चे पत्र व सामंजस्य कराराचा मसूदा सोबत जोडला आहे.

रसायनशास्त्र संकूलाकडे सध्या रासायनिक संशोधन व या संशोधनाकरीता आवश्यक असणारे प्रयोगशाळा, उपकरणे इ. उपलब्ध असल्याने सौराष्ट्र विद्यापीठासमवेत शैक्षणिक व रासायनिक संशोधनाकरीता सामंजस्य करार करण्याबाबत संचालक रसायनशास्त्र संकूल यांनी कळविले आहे. सबब, सामंजस्य करार करण्याची बाब व कराराचा मसूदा विचारार्थ).

**ठराव :** **सौराष्ट्र विद्यापीठाबरोबर रसायनशास्त्र संकूलाचा रासायनिक संशोधनासंबंधीचा सामंजस्य कराराच्या मसूद्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०९ ] कै.आम. काकासाहेब साळुंखे-पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, जवळे या महाविद्यालयातील बी.बी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस व सदर अभ्यासक्रम बंद करण्याबाबत शासनास कळविण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः- मा.अध्यक्ष, विद्या विकास मंडळ, जवळे संचलित कै.आम. काकासाहेब साळुंखे-पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, जवळे यांच्याकडून शै.वर्ष २०११-१२ पासून बी.बी.ए. हा अभ्यासक्रम बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला होता.

शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याचे पाठयक्रमः- बी.बी.ए.

मा.कुलगुरु महोदयांनी यासंदर्भात १) प्रा.व्ही.एच. बदरखे (अध्यक्ष), २) प्रा.बी.एस. खडतरे (सदस्य) आणि ३) प्रा.बी.व्ही. शेंडे (सदस्य) यांची स्थानिक चौकशी समिती नियुक्त केलेली होती.

सदर समितीने उपरोक्त महाविद्यालयास भेट देऊन सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला होता. सदर समितीने महाविद्यालयातील बी.बी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याची शिफारस केलेली होती. सदर अभ्यासक्रम बंद करण्याची बाब दि.२०/१२/२०१० रोजीच्या विद्यापरिषदेच्या सभेत विचारार्थ ठेवली असता सदर विद्यापरिषदेच्या सभेत ठराव क्र. ३९ अन्वये समितीच्या अहवालाचा पुर्नविचार करण्यासाठी व सखोल सविस्तर अहवाल तयार करण्यासाठी खालील समिती गठीत करण्यात आली होती व सदर समितीच्या अहवालावर मा.कुलगुरुंनी निर्णय घ्यावा, असा ठराव करण्यात आला आहे.

१. प्राचार्य डॉ. बी.एम. भांजे (अध्यक्ष)
२. प्रा.डॉ. ए.ए. शेख (सदस्य)
३. प्रा.डॉ. ए.बी. सूर्यवंशी (सदस्य)

या समितीने उपरोक्त महाविद्यालयास भेट देऊन सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे. समितीने उपरोक्त महाविद्यालयातील बी.बी.ए. हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याची शिफारस केलेली आहे.

सदर समितीच्या शिफारशीस मा.कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्यावतीने उपरोक्त ठरावानुसार मान्यता दिलेली आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (४) अन्वये विद्यापरिषदेने अभ्यासक्रम बंद करण्याबाबत शिफारस करण्याचे ठरविल्यास त्याबाबतचा अहवाल व्यवस्थापन परिषदेला सादर करावा लागतो. तसेच कलम ९२ (५) नुसार विद्यापरिषदेला व्यवस्थापन परिषदेच्या पूर्वसहमतीने व शासनाच्या मान्यतेनंतर सदर अभ्यासक्रम बंद करण्यास परवानगी देता येईल.

सबब कै. आम. काकासाहेब साळुंखे-पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, जवळे या महाविद्यालयातील बी.बी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस व सदर अभ्यासक्रम बंद करण्याबाबत शासनास कळविण्याची बाब विचारार्थ).

**ठराव : कै.आम. काकासाहेब साळुंखे-पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, जवळे या महाविद्यालयातील बी.बी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ १० ]** **मुलांच्या आणि मुलींच्या वसतिगृहासाठी प्रभारी रेक्टरची नेमणूक व त्यांचे मानधन ठरविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणीः विद्यापीठात बांधण्यात आलेल्या मुलींच्या वसतिगृहाचे काम पूर्ण झाले असून या वसतिगृहाची क्षमता ८० विद्यार्थिनींची आहे. संबंधित वसतिगृहातील मुलींवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभारी रेक्टरची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे आवश्यक आहे.

मुलांच्या वसतिगृहाचे काम पूर्ण झाले असून या वसतिगृहाची क्षमता २४० विद्यार्थ्यांची आहे. यासाठी प्रभारी रेक्टरची नेमणूक करुन संबंधित प्रभारी रेक्टरचे प्रतिमाह मानधन ठरविणे गरजेचे आहे.

तरी वसतिगृहासाठीच्या रेक्टरचे प्रतिमाह मानधन ठरविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव :** **मुलांच्या आणि मुलींच्या वसतिगृहासाठी प्रभारी रेक्टरची नेमणूक करण्यास व निशुल्क निवास व्यवस्था व**

ERROR: undefined
OFFENDING COMMAND: Rupee

STACK:

/Indian